# मुस्लिम आरक्षण

*प्रा.डॉ. लदाफ शफी खाजामैनोद्दिन*
*इतिहास विभाग , आझाद महाविद्यालय, औसा जि. लातूर , (महाराष्ट्र).*




**प्रस्तावना**

आपल्या देशाचे विभाजन धर्माच्या आधारे झाले. पाकिस्तान हे इस्लामीक राष्ट्र म्हणून निर्माण झाले. ज्या मुस्लिम धर्मीयांना पाकिस्तानात जायाचे होते ते गेले ज्यांना भारतात राहावयाचे होते ते इथेच राहिले. भारतात राहीलेल्या मुस्लिम धर्मियांची संख्याही खूप मोठी होती व आहे. या ऐवढ्या मोठ्या संख्येच्या भारतीय मुस्लिमांच्या मनात मात्र खुप भिती होती व खुप शंका होत्या. आपण भारतात राहिलो, परंतु आपली हाल काय होईल जिवीत आणि वित्त सुरक्षित राहील काय ? धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक अधिकार मिळतील काय ? आणि मिळाले तर ते सुरक्षित राहतील काय ? आपली प्रगती करण्यास आपणास सुयोग्य संधी मिळेल काय ? भारतीय राजकारणात आपणास स्थान राहील काय ? इत्यादी अनेक शंका भारतात राहीलेल्या मुसलमानाच्या मनात होत्या.[1]

भारतातील मुस्लिम समाजाची सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थिती काय आहे या संबंधी माहिती घेणे आवश्यक आहे. कोनात्या राज्यात कोणत्या प्रदेशात कोणत्या जिल्ह्यात मुस्लिम राहतात आणि त्यांचे तिथले प्रमाण काय आहे. त्या–त्या भागात उपजिवीकेसाठी ते कोण कोणते व्यवसाय करतात आणि त्या–त्या भागात त्यांची संपतीची स्थिती काय आहे आणि इतर समाज विभागांशी तुलना करता त्याच्या उत्पनांची पातळी काय आहे ?

त्याचा सामाजिक आर्थिक विकास कसा झाला आहे. आणि त्या–त्या भागातील इतर समाजाशी तुलना केल्यास ते कुठे आहेत ? विशेषः त्याच्या साक्षरतेचे प्रमाण काय आहे ? शिक्षणातील गळतीचे प्रमाण किती आहे ? इतरांशी तुलना करिता ते कसे आहेत खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील नौक–यात त्यांचे प्रमाण किती आहेत. त्या भागातील त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणाशी तुलना करता ते कसे आहेत ? आणि इतर समाजाशी तुलना करता ते कसे किती आहेत ते प्रमाण तसे असण्याची कारणे काय आहेत ? ही सर्व माहिती सच्चर समितीने सुचविले आहेत. यासाठी मुस्लिम समाजाला आरक्षण हा एकमेव उपाय आहे.[2]

भारतात वेगवेगळ्या राज्यांत मुस्लिम समाजात इतर मागसवर्गीय प्रमाण किती आहेत. त्या–त्या राज्यातील एकूण मागासवर्गीयांशी मुस्लिम मागासवर्गीयांचे प्रमाण किती आहे. मुस्लिम ओबीसी यांच्या नोंदी राज्य व केंन्द्रीय मागसवर्गीय कमिशनकडे आहेत काय ? केन्द्र सरकार व राज्य सरकार यांच्या नौक–यात वेगवेगळ्या वर्षात मुस्लिम समाजाचे प्रमाण काय आहे ? शिक्षण संस्था, आरोग्य संस्था, नगरपालिका सारख्या, बॅंका आणि सरकार पुरवत असलेल्या इतर सेवा सुविधा संबंधीच्या संदर्भात समाजाचा ओबीसी यांचा संपर्क असण्याची सोय आहे काय ? असल्यास त्याचे प्रमाण काय आहे. मुस्लिम बहुसंख्य असलेल्या विभाग क्षेत्रात शाळा, दवाखाने, बालसंगोपन केन्द्र व तत्सम संस्था पुरेशा प्रमाणात आहेत काय ? इतर भागातील अशा सोयीशी तुलना करता त्या योग्य प्रमाणात आहेत काय ? ऐवढा तपशीलावर अभ्यास करुन अहवाल सादर करण्याचे काम सच्चर समितीने केले. यांची अमलबजावनी झाली तर यासाठी आरक्षण हा एकमेव उपाय आहे.[3]

मुस्लिम समाजातील किती जणांना रोजगार मिळतो तसेच महिलांना रोजगार मिळतो काय ? रोजगार कोणत्या प्रकारच्या मिळतो ? कायम स्वरुपाचा रोजगार आहे, स्थिर स्वरुपाचा रोजगार आहे ? असेत तर ते कोणत्या स्वरुपाचा व किती उत्पन्न देणारा आहे. इ. सर्व बाजूंनी विचार केल्यास व निषकर्ष आढळल्यास एकूण भारतीयांच्या सरासरीपेक्षा मुस्लिमांचे आर्थिक मागासलेपन जास्त आहे. एकूण हिंदूपेक्षा सर्वच मुसलमान आर्थिक दृष्ट्या अधिक मागासलेपन जास्त आहेत. हिंदू ओबीसी, एस.सी., एस.टी. पेक्षा सुध्दा मुस्लिमांचे मागासलेपन जास्त आहे. यासाठी आरक्षण हा ऐक मेव उपाय आहे.[4]

शैक्षणिक दृष्ट्या मुस्लिम सर्वात जास्त मागासलेले आहेत. कारण मुस्लिमातील शैक्षणिक मागासलेपनास आर्थिक कारण, महत्वाचा मानला जातो. त्यास मुस्लिम समाज ही जबाबदार आहे. पण हे पूर्ण सतय वाहत नाही. आपल्या देशातील साक्षरतेचा दर्जा सुध्दा खूप खालावलेला आहे. त्यात हिंदू पेक्षा मुस्लमांचा साक्षरतेचा प्रमाण खुपच कमी आहे. त्याच बरोबर पदवीधरामधील मुस्लिमांचे प्रमाण खूपच कमी आहे. 2001 च्या शिक्षणगती प्रमाणे देशातील एकूण पदवीधरांची संख्या 3 कोटी 76 लाख 70 हजार होती. यातील मुस्लिम केवळ 23

लाख 90 हजार होते. एस.सी., एस.टी. 30 लाख, 8 हजार होते तर सर्व मिळून 3 कोटी 22 लाख होते. एकूण पदवीधरातील मुस्लिमांचे प्रमाण पहाता मुस्लिमांचे मागासलेपण स्पष्ट दिसते. कसेही पाहिले तर एकूण तर मुस्लिम हे मागासलेल्यापेक्षा मागासलेले आहेत. आणि मागासलेले मुस्लिम अधिकच मागासलेले आहेत.

याचा आर्थिक मागासलेपना व शैक्षणिक मागासलेपना दुर करायचा असेल तर आरक्षण हाच एकमेव उपाय आहे.

## *सारांश :*

आपला देश बहुधार्मिक, बहुभाषिक, बहुजातिय असा आहे. अशा समाजात सर्व विभागांना नोक—यांत पुरेशा प्रमाणात सहभाग मिळणे. आवश्यक असते. त्याखेरीज प्रशासन 'आपले आहे' असे विविध समाज विभागांना वाहत नाही. सरकारी नोकरीत असललेल्यांना विविध पातळ्यांवर निर्णय प्रक्रियेत सहभाग मिळतो. सरकारी योजना राबविण्याची संधी मिळते व लोकशाहीशी संबंध येतो. आपल्या देशात धर्म जातीय आणि जात—जाणीव सर्व दूर पसरली असून ती अगदी घट झाली आहे. या जाणीवामुळे आपल्या धर्माचा आपल्या जातीचा मनुष्य प्रशासनात दिसला पाहिजे ते प्रशासन आपले आहे. असे वाटू लागले असे वाटणे लोकशाहीत आवश्यक असते. त्या—त्या धार्मिक गटांना किंवा जाती गटासांठी हे आवश्यक असतेच परंतु लोकशाहीसाठी सुध्दा आवश्यक असते. आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक असते. सामान्य मानसाला प्रशासनासंबंधी आपलेपण वाटत नसेल तर लोकशाहीला व राष्ट्रीय एकात्मतेला हे हानीकारक असते हे प्रशासन आपले नाहीत हे लोकप्रतिनिधी आपले नाहीत हे सरकार आपले नाहीत अशी भावना समाजाच्या एखाद्या विभागात निर्माण होने रुजने घट्टी होणे हे देश हिताचे नसते.

वरील मतभेद हे मुस्लिम समाजाच्या बाबतीत दिसून येते. कारण मुस्लिमांची आर्थिक स्थितीची अत्यंत खालावलेली आहे. आज हा समाज संपूर्ण देशात राज्यात व्यापार क्षेत्रात किंवा मजुर कामगार किंवा यापेक्षा खालच्या क्षेत्रात कार्यात गुंतलेला दिसून येतो. कारण भारतीय प्रशासनात त्यांना आरक्षण नसल्यामुळे शिक्षण कशाला शिकायचे शिक्षण शिकून काय मिळणार आहे. यांचा मोठा परिणाम या मुस्लिम धर्मातील जनतेला झालेला दिसून येतो.

सच्चर समितीच्या अहवालानुसार भारतीय प्रशासन सेवा (आय.ए.एस.) भारतीय प्रदेश सेवा, भारतीय पोलीस सेवा (आय.पी.एस) या महत्वाच्या सेवामधील मुस्लिमांचे प्रमाण खूपच कमी आहे.

आय.ए.एस. 3 टक्के, आय.ए.एफ. 1.8 टक्के, आय.पी.एस. 4 टक्के असे मुस्लि धमिर्याचे प्रमाण आहे. सच्चर समिती या प्रमाणांचीही पुन्हा छाननी केली त्यांना असे आढळून आले की यातील बहुसंख्य व्यक्तींना या वरिष्ठ पदावरील जागा बढत्यांमुळे मिळालेल्या आहेत. परंतु थेट निवड होऊन नेमणूक झालेल्याचे प्रमाण कमी आहे. तसेच भारतीय रेल्वे सेवेत मुस्लिमांचे प्रमाण केवळ 4.5 टक्के आहे. त्यातील 98.7 टक्के नोक—याचा कनिष्ठ पातळीवरील आहेत. त्याच बरोबर सार्वजनिक मालकीच्या बॅकेत मुस्लिमांचे प्रमाण केवळ 2.2 टक्के आहे. सुरक्षा एजन्सी मध्ये 3.2 टक्के आहेत. इतर अल्पसंख्यकांशी तुलना करताना सुध्दा मुस्लिामंचे नौक—यातील प्रमाण कमी आहे. मुस्लिमोत्तर अल्पसंख्याचे अ वर्गीय वरिष्ठ सेवेतील प्रमाण 11 टक्के आहे. कोणत्याही बाजुने तपासले तरी मुस्लिमांचे प्रमाण कमी आहे.

यासाठी कोणत्याही प्रकारचे भेदभाव न करता मुस्लिमांसाठी जाहीर केले 5 टक्के आरक्षण तात्काळ आणि विलंब न करता लागू करावे. तर मुस्लिम समाजाचा आर्थिक, शैक्षणिक विकास घडून येईल आज आपल्या देशविरोधी कृत्य जैसे अतेरेकींशी संबंधीत या धर्माशी संबंध बांधला जातो. किंवा तसे ते करण्यास प्रवृत्त होतात. याला मी म्हणेन मुस्लिम समाजाचा शैक्षणिक मागासलेपना तातडीने दुर करणे आवश्यक आहे. यासाठी शासनाने ताबडतोब निर्णय घेणे आज काळाची गरज आहे. यासाठी मुस्लिम समाजाने सुध्दा भारताशी व आपल्या राज्याशी एकनिश्ठता दाखवने आवश्यक आहे.

## *संदर्भग्रंथ सूची :*

1.राज्यघटना आणि अल्पसंख्याक समाज सच्चर समिती आणि मागसलेले मुस्लिम, पृष्ठ क्र. 8.
2.गोविंद पानसरे, सच्चर समिती व मागासलेले मुस्लिम, पृष्ठ क्र. 5, 6.
3.सच्चर समिती आणि मागासलेले मुस्लिम, पृष्ठ क्र. 7.
4.माधवराव पाटील महाविद्यालय मुख्य जि. उस्मानाबाद, पृष्ठ 2, 3.